# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक **1077** फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २०/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** **आपत्ती प्राधान्य**

**वाचा:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १३/०३/२०२०.

३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १४/०३/२०२०.

**आदेश**

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड १,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हीड १९) नियंत्रण आणण्यासाठी व त्यांच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत. तथापी, माझे असे निदर्शनास आले आहे की, जालना जिल्ह्यात सर्व प्रकारचे दुकाने, हॉटेल, धाबे, परमिट रूम, बेकरी, स्वीट मार्ट, चाट भांडार, इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत आहे.

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र.३ च्या अधिसुचने अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० लागू केले आहे.

त्याअर्थी, मी, **रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** जिल्ह्यात करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जालना जिल्ह्यातील

१. शासकीय / निमशासकीय कार्यालये.
२. पिण्याचे पाणी पुरवठा व सांडपाणी निचरा व्यवस्थापन करणा-या आस्थपाना.
३. सर्व बँका.
४. दूरध्वनी व इंटरनेट सेवा पुरवठा करणा-या आस्थापना.
५. रस्ते वाहतूक व रेल्वे व्यवस्था.
६. अन्न, भाजीपाला व किराणा पुरविणा-या आस्थापना.
७. दवाखाने, वैद्यकीय केंद्र व औषधी दुकाने.
८. विद्युत पुरवठा, ऑईल व पेट्रोलिअम व उर्जा संसाधने.
९. प्रसार माध्यमे, मिडिया.
१०. अत्यावश्यक सेवा देणा-या आय. टी आस्थापना.

**वरील आस्थापना व दुकाने वगळून इतर सर्व आस्थापना व दुकाने दिनांक २१.०३.२०२० व २२.०३.२०२० रोजी बंद करणे बाबत आदेशीत करीत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना, पोलीस अधीक्षक जालना, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क जालना, सर्व उपविभागीय अधिकारी जिल्हा जालना, सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासन, सर्व तहसीलदार, सर्व सबंधित नगरपालिका / नगरपंचायत मुख्याधिकारी, ग्रामसेवक, तलाठी. इत्यादींची असेल.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती, संस्था, अथवा समूह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ तसेच भारतीय दंडसंहिता १८६० चे कलम १८८ नुसार निक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी.

Rawt

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**
20/3/2020

प्रत :

१. पोलीस अधीक्षक, जालना यांना पुढील कार्यवाहीस्तव.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांना पुढील कार्यवाहीस्तव.
३. सर्व उपविभागीय अधिकारी जिल्हा जालना
४. सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांना यांना पुढील कार्यवाहीस्तव.
५. सर्व तहसीलदार जि.जालना यांना पुढील कार्यवाहीस्तव.
६. सर्व मुख्याधिकारी नगरपालिका / नगरपंचायत जि. जालना यांना पुढील कार्यवाहीस्तव.
७. जिल्हा माहिती अधिकारी, जालना यांना प्रसिद्धीस्तव.